**महाराष्ट्र शासन-जलसंपदा विभाग,**
**प्रादेशिक निवड समिती, पुणे**
**(व्दारा- कोयना बांधकाम मंडळ, सातारा)**
**जाहिरात क्रमांक : ०१ : सन २०११**

जलसंपदा विभागाच्या आस्थापनेवरील व अधिपत्याखाली असलेल्या विविध कार्यालयातील, सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, नगर, सोलापूर या जिल्ह्यातील गट क संवर्गातील **अपंग या सदराखालील** (OA, OL, OAL, BL,B, LV, HH) विविध रिक्त पदे भरण्याकरिता सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेवारांकडून प्रादेशिक निवड समिती, पुणे यांचे वतीने विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. याबाबतची सविस्तर माहिती (पदासाठीच्या अर्हतेच्या अटी वयोमर्यादा, शैक्षणीक अर्हता आवश्यक प्रमाणपत्रे इत्यादी) **http://oasis.mkcl.org/wrd2011** या संकेतस्थळावर पहावयास मिळेल.

१) रिक्त पदांच्या भरती प्रक्रियेबाबतचा सर्वसाधारण कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

१) अर्ज विक्रीचा कालावधी : दिनांकः- ३०/०८/२०११ ते १५/०९/२०११

२) अर्ज स्वीकृतीचा कालावधीः दिनांक :- ३०/०८/२०११ ते १५/०९/२०११

३) लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी दि. १७/०९/२०११ ते १९/०९/२०११

४) लेखी परिक्षेचा दिनांकः- ०२/१०/२०११ (संभाव्य)

**५)** परिक्षा केंद्रः- **सातारा मुख्यालय**

६) अर्ज प्राप्ती व स्विकृतीचे ठिकाण : विहित अर्जाची किंमत रुपये २५/- इतकी रोखीने भरुन अर्ज एम.के.सी.एल चे अधिकृत अध्ययन केंद्रातून (A.L.C.) प्राप्त करुन घ्यावेत .सदर केंद्राची यादी एम.के. सी.एल. च्या वरील संकेत स्थळावर उपलब्ध आहे. उमेदवारांनी ज्या केंद्रामधून अर्ज हे (विहीत परिक्षा शुल्कासह) ज्या केंद्रातून अर्ज खरेदी केले त्याच केंद्रामध्ये उमेदवाराने सादर करावेत.

२) अपंग व्यक्तीसाठी संबंधित जिल्ह्यामधील शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय तज्ञांचे विहीत प्रमाणपत्र आधारभूत धरणेत येईल. तसेच अपंगत्वाचे **किमान प्रमाण ४० टक्के** असणे आवश्यक आहे. सदर अपंगत्वाचे प्रमाणपत्र अर्जासोबत उमेदवाराने जोडणे आवश्यक आहे.

३) अपंग व्यक्तीची निवड झाल्यानंतर (परीक्षेनंतर) त्याची नियुक्ती करण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकीय मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्याची अंतिम नियुक्ती देणेत येईल.

| अ.क्र | संवर्ग व वेतन बँड व ग्रेड वेतन (रुपये) | अपंगासाठीची आरक्षित रिक्त पदे | | | | | | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लोव्हीजन (क्षीणदृष्टी) | | अस्थिव्यंग | | मुक बधिर / कर्ण बधिर | | |
| | **गट-क** | अपंगत्वाचा प्रकार | आरक्षित पदे | अपंगत्वाचा प्रकार | आरक्षित पदे | अपंगत्वा चा प्रकार | आरक्षित पदे | |
| 1 | अनुरेखक<br>पीबी-1 : 5200-20200<br>ग्रेड वेतन 2000 | LV | 06 | OL, BL, | 02 | -- | -- | 08 |
| 2 | प्रयोगशाळा सहाय्यक<br>पीबी-1 : 5200-20200<br>ग्रेड वेतन 2000 | -- | -- | OA, OL, BL | 01 | -- | -- | 01 |
| 3 | वरिष्ठ लिपीक<br>पीबी-1 : 5200-20200<br>ग्रेड वेतन 2400 | B, LV | 04 | -- | -- | HH | 04 | 08 |
| 4 | लिपीक-नि-टंकलेखक<br>पीबी-1:5200-20200<br>ग्रेड वेतन 1900 | B, LV | 16 | -- | -- | HH | 11 | 27 |
| 5 | भांडारपाल<br>पीबी-1 : 9300-34800<br>ग्रेड वेतन 4800 | -- | -- | -- | -- | HH | 01 | 01 |
| 6 | सहाय्यकभांडारपाल<br>पीबी-1: 5200-20200<br>ग्रेड वेतन 1900 | -- | -- | -- | -- | HH | 01 | 01 |

(**OA -** वन आर्म अफेक्टेड , **OL -** वन लेग अफेक्टेड , **OAL –** वन आर्म अँड लेग अफेक्टेड, **BL –** बोथ लेग अफेक्टेड ,**B -** ब्लाईंड , **LV –** लो व्हिजन, **HH –** हिअरिंग हँडीकॅप्ड)

**टीप :** तथापि वरील पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार **प्रादेशिक निवड समिती, पुणे** यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.

**१) अ)** उमेदवारांना छापील अर्ज महाराष्ट्र ज्ञान मंडळ, लि. पुणे (एम.के.सी.एल) यांचे अधिकृत केंद्रामार्फत दिनांक **३०/०८/२०११ ते दिनांक १५/०९/२०११** या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी (शासकीय व स्थानिक सुट्टया वगळून) प्राप्त करुन घेता येतील. व त्याच ठिकाणी अर्ज स्वीकारले जातील. अर्जाचे मूल्य रुपये २५/- इतके राहील. अर्जासोबत विहित परीक्षा शुल्क संबंधीत अध्ययन केंद्रामध्ये रोखीने भरावे लागेल. परीक्षा शुल्क खालीलप्रमाणे राहिल.

वरिष्ठ लिपीक, लिपीक-नि-टंकलेखक , भांडारपाल, सहाय्यक भांडारपाल या पदांसाठी मागासवर्गीय उमेदवारांना रुपये ७५/- व इतर उमेदवारांना रुपये १५०/- इतके परीक्षा शुल्क राहिल. अनुरेखक, व प्रयोगशाळा सहाय्यक, या पदांसाठी मागासवर्गीय उमेदवारांना रुपये १००/- व इतर उमेदवारांना रुपये २००/- इतके परीक्षा शुल्क राहिल.

ब) उमेदवारांन लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र दि. १७/९/२०११ ते १९/०९/२०११ या कालावधीत एम.के.सी.एल. अधिकृत केंद्रामार्फतच प्राप्त करुन घेता येतील.

**२)** छाननीअंती अर्ज वैध ठरलेल्या अर्जदारानांच लेखी परिक्षेस पात्र समजण्यात येईल. याबाबत प्रादेशिक निवड समिती, पुणे यांचा निर्णय अंतिम राहील.

**३)** प्राधिकृत केंद्रावरुन अर्ज प्राप्त करणे व अधिकृत केंद्रावरच परिपूर्ण भरलेले अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. उमेदवारांने अथवा त्याच्या प्रतिनिधीने समक्ष उपस्थित राहून अर्ज सादर करावा. अन्य कोणत्याही पध्दतीने/मार्गाने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**४)** वरील अर्जाव्यतिरिक्त उमेदवाराने यापूर्वी वेगवेगळ्या कार्यालयाकडे नोकरीसाठी केलेले अर्ज ग्राह्य ठरणार नाहीत याची विशेष नोंद घेण्यात यावी.

**५)** वरील सर्व पदांसाठी एकाच दिवशी एकाच वेळी परिक्षा घेण्यात येणार आहे. सबब अर्जदारास केवळ एकाच पदासाठी अर्ज करता येईल. अर्जदाराने एकापेक्षा जास्त पदांसाठी अर्ज केल्याचे आढल्यास त्या अर्जदाराचे सर्व अर्ज अवैध ठरविण्यात येतील.

## सर्वसामान्य अटी

**(अ) वयोमर्यादा :**

सर्व उमेदवारांचे वय दिनांक २९/०८/२०११ रोजी किमान वय १८ वर्ष पूर्ण व कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.

**(ब) शैक्षणीक अर्हता :**

**१)अनुरेखक** : माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण व महाराष्ट्र शासनमान्य इंटरमेडियट ग्रेड ड्राईंग परिक्षा उत्तीर्ण असावा.

**२) प्रयोगशाळा सहाय्यक :** मान्यता प्राप्त विद्यापीठाचा रसायनशास्त्र विषय घेऊन पदवी प्राप्त असावी किंवा मान्यताप्राप्त कृषी विद्यापीठाचा पदवीधर असावा.

**३) वरिष्ठ लिपीक :-** संवर्गातील पदासाठी शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, अधिसूचना क्रमांक आरटीआर-१०८७/१०५१५८ (१५५) आस्था-२, दिनांक १५/४/१९९४ अन्वये उमेदवार कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा.

**४) लिपीक-नि-टंकलेखक:-** संवर्गातील पदासाठी शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसुचना दि. १८/१२/१९८६ अन्वये उमेदवार माध्यमिक शालांत परीक्षा(एस.एस.सी.) उत्तीर्ण व इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनीट किंवा मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रति मिनीट अर्हतेचे शासन मान्य व्यावसायीक संस्थेचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

**५) भांडारपाल :-** संवर्गातील पदासाठी शासन ,पाटबंधारे व वीज विभाग निर्णय क्रमांक बीसीएस १०७०/४०२०९/इ(१) दिनांक १२/४/१९७२ अन्वये उमेदवार कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा.

**६) सहाय्यक भांडारपाल:-** संवर्गातील पदासाठी शासन ,पाटबंधारे व वीज विभाग निर्णय क्रमांक बीसीएस १०७०/४०२०९/इ(१) दिनांक १२/४/१९७२ अन्वये उमेदवार माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.)उत्तीर्ण किंवा तत्सम शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण असावा.

**शैक्षणिक अर्हता :**

**(क) संगणक अर्हता :** वरील पदासाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक प्रशिक्षण- २०००/प्र.क्र.६१/२००१ /३९, मंत्रालय, मुंबई दिनांक १९ मार्च २००७ अनुसार संगणक अर्हता (एम.एस.सी.आय.टी.) नियुक्तीचे दिनांकापासून २ वर्षाचे आत धारण करणे आवश्यक राहील..अन्यथा नियुक्त उमेदवारांच्या सेवा आपोआप समाप्त करण्यात येतील.

**(ड)इतर अटी :**

१) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमीसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला अर्जासोबत जोडावे.

२) उमेदवारास मराठी लिहीता व वाचता येणे आवश्यक आहे.

३) उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्जावर विहीत ठिकाणी पासपोर्ट आकाराचे फोटो चिकटवावेत. फोटोला टाचणी अथवा पीन लावू नये.

४) ज्यांचे अर्ज छाननी अंती वैध ठरतील अशा उमेदवारांसाठी त्या पदासाठी घेण्यात येणा-या परिक्षेची रुपरेषा/वेळापत्रक/परिक्षा केंद्र/बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती सदस्य सचिव, प्रादेशिक निवड समिती, पुणे तथा अधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, कृष्णानगर वसाहत, सातारा येथे उपलब्ध राहील. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

५) छाननीअंती अर्ज परिपूर्ण व योग्य शुल्कासह असल्यासच उमेदवाराचा अर्ज विचारात घेण्यात येईल. याबाबतीत सदस्य सचिव, प्रादेशिक निवड मंडळ, पुणे तथा अधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, कृष्णानगर वसाहत, सातारा. यांचा निर्णय अंतिम राहील. अधिकृत अर्जाव्यतिरिक्त अन्य कुठलाही अर्ज विचारात घेतला जाणार नाही. अर्जाची स्वीकृती म्हणजे उमेदवाराची परिक्षेसाठी निवड समजली जाणार

नाही. अर्जाच्या छाननीनंतरच सर्वतोपरी परिपूर्ण व पात्र असलेल्या अर्जदारानाच लेखी परिक्षेसाठी बसता येईल.

६) उमेदवारांच्या लेखी परिक्षेचे ठिकाण सातारा तसेच प्रात्यक्षिक व मौखिक परिक्षेचे ठिकाण सुध्दा सातारा शहर येथे राहील. परिक्षा केंद्राचा संकेतांक क्रमांक, वेळ व दिनांक इ. तपशील पात्र उमेदवारांना अधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, सातारा या कार्यालयात उपलब्ध होईल. तसेच अर्ज भरलेल्या केंद्रावर परिक्षेचे प्रवेशपत्र दिनांक १७/ ०९ /२०११ ते १९ / ०९ /२०११ पावेतो कार्यालयीन वेळेत देण्यात येईल. प्रवेशपत्र प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. परिक्षेचे ठिकाण, वेळ, परिक्षा केंद्राची माहिती वा त्यात होणारे बदल इत्यादी हे वर निर्देशित केलेल्या संकेत स्थळावरुन पाहता येईल.त्यासाठी वेगळी सूचना दिली जाणार नाही.

७) उमेदवारास परीक्षा केंद्रावर स्वखर्चाने यावे लागेल.

८) जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार कार्यालयात नांव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहीत नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर अर्ज करणे आवश्यक आहे.

९) अर्जासोबत शैक्षणीक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, व दि. १/४/११ नंतरचाच नॉनक्रिमीलेअर दाखला अर्जासोबत आवश्यक आहे. तसेच आवश्यक ती कागदपत्रे/प्रमाणपत्रे साक्षांकित करुन त्याच्या प्रती जोडणे आवश्यक आहे. साक्षांकन हे केंद्र/राज्य शासनाने राजपत्रित अधिकारी/पोष्टमास्तर/मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनीच केलेले असावे तसे नसल्यास व चुकीची माहिती, अपुरे वा शुल्क न भरलेले अर्ज तसेच अधिकार नसूनही साक्षांकित झालेले प्रमाणपत्र दाखल असलेले अर्ज अवैध ठरविले जातील.

१०) अनुभवाच्या कालावधीची गणना करतांना तासिका, नियतकालिक, अशंकालिक, विद्यावेतन, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेल्या अशंकालिक सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणुकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी ग्राह्य धरला जाणार नाही.

११) विहीत वयोमर्यादेतील इच्छुक शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखाच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

१२) सा.प्र.वि. शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-२००-प्रक्र-१७ (२००)/१२ दि. २८ मार्च २००५ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०००/प्रक्र-१७/२०००/१२ दि. १ जुलै २००५ नुसार लहान कुंटूंब असल्याचे अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. अविवाहीत असणा-या अर्जदारांनीही नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

१३) एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष राजकीय दबाव आणल्यास अथवा गैर प्रकाराचा अवलंब केल्यास अथवा चुकीची वा खोटी माहिती दिली असल्याचे आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून तात्काळ बाद करण्यात येईल.

१४) अपंग प्रवर्गातील उमेदवाराने किमान अपंगात्वाचे प्रमाण ४० टक्के असल्या बाबतचे स्थायी वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्र व या बाबतच्या कागदपत्राच्या छायांकित प्रति साक्षांकित करुन अर्जा सोबत जोडाव्यात लेखी परीक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास अर्जात तसा स्पष्ट उल्लेख करावा. लेखनिकाची परिक्षेच्या एका सत्राची शुल्क रक्कम रुपये १००/- अर्जासोबत रोखीने जमा करावी लागेल व ती ना-परतावा राहील.

## ७) परीक्षेचे स्वरुप :-

| अ.क्र. | संवर्ग | परीक्षेसाठी गुण | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | लेखी परीक्षा | व्यावसायिक चाचणी | मौखिक परीक्षा | एकूण गुण |
| | **गट क** | | | | |
| १ | अनुरेखक | १०० | ८० | २० | २०० |
| २ | प्रयोगशाळा सहाय्यक | १०० | ८० | २० | २०० |
| ३ | वरिष्ठ लिपिक | २०० | -- | -- | २०० |
| ४ | लिपिक नि टंकलेखक | २०० | -- | -- | २०० |
| ५ | भांडारपाल | २०० | -- | -- | २०० |
| ६ | सहाय्यक भांडारपाल | २०० | -- | -- | २०० |

अ) प्रयोगशाळा सहाय्यक, वरिष्ठ लिपिक, भांडारपाल या पदांकरिता किमान शैक्षणीक अर्हता पदवीधर आहे. त्या परिक्षेचा अभ्यासक्रम साधारणपणे पदवीधारक दर्जा समान असेल.

ब) १) अनुरेखक पदाकरीता कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी ) आहे, अशा पदांकरीता लेखी परिक्षेचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जासमान असेल. लेखी परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान व अंकगणित या विषयांवर प्रत्येकी २५ गुणांचे वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न असतील. अनुरेखक व प्रयोगशाळा सहाय्यक या पदाकरिता लेखी परीक्षा १०० गुणांची घेण्यात येईल व व्यावसायिक परिक्षा ८० गुणांची घेण्यात येईल. वरिष्ठ लिपिक, लिपिक नि टंकलेखक, भांडारपाल, सहाय्यक भांडारपाल या पदाकरिता लेखी परिक्षेला अ) मराठी ब)इंग्रजी क) गणित ड)सामान्यज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावर प्रत्येकी ५० गुणाचे वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी प्रश्न असतील. वरिष्ठ लिपीक व भांडारपाल या पदाकरीता लेखी परिक्षेचा अभ्यासक्रम हा सामान्यतः पदवी परिक्षेच्या दर्जा समान असेल. तसेच लिपिक-नि-टंकलेखक व सहाय्यक भांडारपाल या पदाकरिता लेखी परिक्षेचा अभ्यासक्रम हा माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जा समान असेल.

लेखी परीक्षा एकूण २०० गुणांची घेण्यात येईल.

क) अनुरेखक व प्रयोगशाळा सहाय्यक, या पदांसाठी मौखिक परीक्षा ठेवली आहे, या पदांसाठी उमेदवाराच्या परिक्षेतील लेखी व व्यावसायिक चाचणीतील गुणवत्तेनुसार मुलाखती करिता पात्रता ठरवून

अशा अनुरेखक व प्रयोगशाळा सहाय्यक पदासाठीच्या उमेदवारांची २० गुणांची मौखिक परिक्षा घेण्यात येईल. लेखी, व्यावसायीक चाचणी, मौखिक परिक्षेचे गुण एकत्रित करुन अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल. मौखिक परिक्षेसाठी गैरहजर राहील्यास उमेदवाराची निवड करण्यात येणार नाही.

ड) रिक्त पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. तसेच काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगित झाल्यास त्या बाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे तसेच सेवाभरती प्रक्रियेत बदल करणे या बाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष, प्रादेशिक निवड समिती, पुणे स्वतःकडे राखून ठेवत आहेत. भरती प्रक्रिये संदर्भात उद्‌भवणारे वाद, तक्रारी इत्यादी बाबत अध्यक्ष, प्रादेशिक निवड समिती, पुणे यांचा निर्णय अंतिम राहील.

**इ) परिक्षेस बसण्याची अनुमती मिळाल्यावरुन उमेदवारांस नियुक्तीबध्दलचा अथवा नियुक्ती प्रक्रियेबध्दलचा कोणताही हक्क सांगता येणार नाही.**

**८)** नियुक्ती होणा-या उमेदवारास शासन निर्णय दि. ०१ नोव्हेंबर २००५ अनुसार लागू करण्यात आलेली परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

**९)** निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी / नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

**१०)** सदरची पदे अस्थायी स्वरुपाची असून शासनाच्या धोरणअंती उमेदवाराची सेवा एका महिन्याची नोटीस देऊन केव्हांही समाप्त करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेल्या पदावर उमेदवारास नियुक्तीचा कोणताही हक्क सांगता येणार नाही.

**११)** सदर जाहिरात रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या http:/ese.mah.nic.in या संकेत स्थळावर देखील उपलब्ध आहे.

**१२)** या जाहिराती संबंधीत कोणतेही न्यायालयीन प्रकरण हे मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, मुंबई यांचे कार्यकक्षेत राहील.

## १३) अंतिम निवड :-

अ) उमेदवारांची अंतिम निवड ही वरील **अट क्र.७** मधील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे लेखी व्यावसायीक चाचणी व मौखिक परिक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल.

ब) एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम खालील निकषांवर क्रमवार लावला जाईल.

१) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतर

२)    मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत प्रथम अनु.जाती, अनु. जमाती, विमुक्त जाती, ( १४ व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी-१९९० पूर्वीच्या -२८ व तत्सम जमाती) भटक्या जमती ( धनगर व तत्सम), वि.मा.प्र, इतर मागास वर्ग या क्रमांने

३)    माजी सैनिक असलेले उमेदवार,

४)    स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार,

५)    वय (वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल )

वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

**१४)** अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना सातारा, कोल्हापूर, सांगली, अहमदनगर, पुणे व सोलापूर यापैकी कोणत्याही जिल्ह्यात व प्रसंगी महाराष्ट्र राज्यात कोठेही नियुक्ती देण्यात येईल.

**१५)** शासन नियुक्तीनंतर नियुक्तीच्या पदास सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक त्या विभागीय परीक्षा, मराठी, हिंदी व परीक्षा संगणक अर्हता विहीत कालावधीत उत्तीर्ण / धारण करणे आवश्यक आहे. अन्यथा सदरची सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

**१६)** अपंग व्यक्तीसाठी संबंधित जिल्ह्यामधील शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय तज्ञांचे प्रमाणपत्र आधारभूत धरणेत येईल. तसेच अपंगत्वाचे किमान प्रमाण **४० टक्के** असणे आवश्यक आहे. तसेच लोव्हीजन व अशंतः कर्णबधीर यांची व्याख्या केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती अधिनियमाप्रमाणे राहील.

**१७)** सर्वसामान्य अटी मधील ब-१ मधील नमूद केलेले शैक्षणीक अर्हता ही किमान शैक्षणीक अर्हता आहे.

**१८)** अपंग व्यक्तीची निवड झाल्यानंतर त्याची नियुक्ती करण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकीय मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्याची अंतीम निवड करणेत येईल.

**स्थळ :- सातारा.**

**सदस्य सचिव, प्रादेशिक निवड समिती,पुणे तथा**
**अधीक्षक अभियंता,**
**कोयना बांधकाम मंडळ,सातारा.**